


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com
RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे | अंक : ३०१ वा | शनिवार दि १४ फेब्रुवारी २०२६ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# दिव्यांग पडताळणीवर मोठा घोटाळा?...

## २०० पैकी फक्त ६० कर्मचारी हजर; मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पत्राला केराची टोपली!

## सिटी न्यूजच्या पाठपुराव्याने हलले प्रशासन; गैरहजर कर्मचाऱ्यांवर संशयाची सुई!

**त्या कर्मचाऱ्याच्या संपर्कात किती बोगस प्रमाणपत्र धारक आहेत. तो किती दिवस लक्ष्मीदर्शन घेऊन ही विविध कारणे समोर आणणार कानून के हात बहुत लंबे है हे त्याने विसरून चालणार नाही.**

**पाठपुरवठा**







जनसंचलन/बुलढाणा

जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत असलेल्या दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या ओळखपत्र आणि प्रत्यक्ष तपासणीच्या मुद्द्यावर अखेर प्रशासनाला हालचाल करावी लागली असून,यामागे ङ्कसिटी न्यूजफ्ने सातत्याने लावून धरलेला पाठपुरावा कारणीभूत ठरत असल्याची चर्चा जिल्ह्यात रंगली आहे.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पत्रानंतर कर्तव्यदक्ष जिल्हा शल्य चिकित्सकांनी कारवाईची चाकं फिरवली असली,तरी पहिल्या टप्प्यातील कॅम्पकडे कर्मचाऱ्यांनी केलेल्या दुर्लक्षामुळे अनेक प्रश्नचिन्हे निर्माण झाली आहेत. प्राप्त माहितीनुसार,जिल्हा परिषद अंतर्गत दिव्यांग म्हणून नोंद असलेल्या कर्मचाऱ्यांची युडीआयडी तपासणी व वैद्यकीय पडताळणी करण्याचे आदेश देण्यात आले होते.त्यानुसार आयोजित करण्यात आलेल्या कॅम्पमध्ये दिव्यांग/अस्तिव्यंग धारकांना सूचना देऊनही तब्बल २०० पैकी केवळ ६० कर्मचारी उपस्थित राहिल्याने प्रशासनालाच धक्का बसला.एवढ्या मोठ्या प्रमाणावर गैरहजेरी का राहिली? काही जण जाणीवपूर्वक तपासणीपासून दूर राहिले का? असे सवाल आता उपस्थित होत आहेत.जिल्हा शल्य चिकित्सकांनी स्पष्ट इशारा देत येत्या सोमवारी पुन्हा विशेष कॅम्प घेण्यात येणार असल्याचे सांगितले आहे.यावेळी तपासणीदरम्यान कोणतीही शंका किंवा विसंगती आढळल्यास संबंधित प्रकरणे वैद्यकीय बोर्डाकडे पाठवून अकोला येथे पुढील पडताळणी केली जाणार आहे. त्यामुळे खोट्या प्रमाणपत्रांच्या आधारे शासकीय लाभ घेत असलेल्या कर्मचाऱ्यांची धास्ती वाढली आहे. दरम्यान, हा संपूर्ण प्रकार दिव्यांग कल्याण बोर्डाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी महाराष्ट्र राज्यात बोगस दिव्यांग प्रमाणपत्र पडताळणी व आरोग्य तपासणीचे पत्र प्रत्येक जिल्हा परिषदला दिले व राज्यातील जिल्हा परिषद खबडून जागी झाली या प्रकरणाचा सुरुवाती पासूनच ङ्कसिटी न्यूजफ्ने सातत्याने पाठपुरावा करून मिळालेल्या माहिती नुसात बोगस दिव्यांग धारकांची पोलखोल सुरू करून प्रकरण उघडकीस आणल्यानंतरच संबंधित प्रशासनाला हालचाल करावी लागली. पडताळणी व तपासणीला काही दोषी पाठ दाखवत आहे. परंतु जिल्हा शल्य चिकित्सक यांनी मिळालेल्या पत्रावर कारवाई सुरू केली आहे.आता सोमवारी होणाऱ्या कॅम्पमध्ये किती कर्मचारी हजर राहतात आणि संशयित प्रकरणांवर कितपत कठोर कारवाई होते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. प्रशासनाने केवळ औपचारिकता न करता पारदर्शक आणि कठोर भूमिका घ्यावी,अशी जोरदार मागणीही खऱ्या दिव्यांगाकडून होत आहे.

## हप्ते रखडले अन् आंदोलन भडकले; पोलिस बंदोबस्तात लाभार्थ्यांची जोरदार घोषणाबाजी!



जनसंचलन/बुलढाणा

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या घरकुलांच्या उर्वरीत हप्त्यांचा प्रश्न प्रलंबित राहिल्याने रायपूर येथील लाभार्थ्यांचा संयम अखेर संपला असून आज त्यांनी प्रशासनाविरोधात आक्रमक आंदोलन छेडले. वारंवार निवेदने देऊनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने लाभार्थ्यांनी रस्त्यावर उतरून संताप व्यक्त केला. शमीम सौदागर, निलेश राजपूत यांच्यासह अनेक लाभार्थ्यांना केवळ एक किंवा दोनच हप्ते मिळाल्याने घर बांधकाम अर्धवट अवस्थेत थांबले आहे. दरम्यान, तात्पुरत्या निवासासाठी भाड्याने राहावे लागत असल्याने आर्थिक अडचणींचा डोंगर उभा राहिला आहे. प्रशासनाने सात दिवसांत हप्ते वितरीत न केल्यास कुटुंबासह रस्त्यावर उतरून आंदोलनाचा इशारा दिला होता; मात्र मुदत उलटूनही निर्णय न झाल्याने आज प्रत्यक्ष आंदोलन करण्यात आले. आंदोलनादरम्यान घोषणाबाजी करत लाभार्थ्यांनी घरकुल द्या, न्याय द्याफ्क अशी मागणी लावून धरली. प्रशासनाच्या निष्क्रियतेवर तीव्र टीका करत तातडीने निधी वितरीत करण्याची मागणी करण्यात आली. दरम्यान, परिस्थिती चिघळू नये म्हणून पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला असून प्रशासन आता काय भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जेव्हा बॉट्स गप्पा मारु लागतात!




कल्पना करा, तुम्ही एका अशा सोशल मीडिया पेजवर गेला आहात, जिथे निवांत कट्ट्यावरच्या चर्चा सुरू आहेत. कोणीतरी विनोद सांगतंय, कोणी गंभीर विषयावर वाद घालतंय, कोणी धार्मिक गोष्टींवर भाष्य करतंय, तर कोणी कोणाला आरोग्याचे सल्ले देतंय. आता तुम्ही म्हणाल, यात काय विशेष? फेसबुक आणि इन्स्टाग्रामवर तर आम्ही पण पडीक असतो आणि हेच तर करतो! पण एक विचित्र गोष्ट मी तुम्हाला सांगितली तर? त्या संपूर्ण पानावर तुमच्याशिवाय दुसरा कोणताही माणूस नाही! तिथे बसलेले सगळेच बॉट्स किंवा एआय एजंट्स आहेत आणि त्यांची ही रंगलेली चर्चा सुरू आहे. तुम्ही माणसं फक्त त्यांना लांबून पाहू शकता. हे ऐकायला एखाद्या हॉलिवूडपटातल्या विज्ञान कथेसारखं वाटतंय ना? पण हे आता प्रत्यक्षात घडलं आहे. इंटरनेटच्या जगात एक नवीन क्रांती शांतपणे सुरू झाली आहे, जिचा पत्ता अजून सर्वसामान्यांना लागलेला नाही. या क्रांतीचं नाव आहे साध्या भाषेत सांगायचं तर, मोल्टबुक हे एआय एजंट्स अथवा सॉफ्टवेअर्ससाठी बनवलेलं फेसबुक किंवा रेडिट आहे. आपण फ `सबुकवर फोटो टाकतो, ट्विटरवर मतं मांडतो; पण मोल्टबुकवर ही सगळी कामं फक्त एआय सॉफ्टवेअर्स करतात. इथे खाते उघडणारा कोणताही माणूस नसून तो एक चॅटबॉट किंवा एआय एजंटफ असतो. या प्लॅटफॉर्मवर माणसं फक्त रीड-ओन्लीफ (-) मोडमध्ये आहेत. म्हणजे आपण तिथे काय चाललंय ते वाचू शकतो, पण स्वतः काहीही लिहू शकत नाही किंवा कमेंट करू शकत नाही. आजवर सोशल मीडियाला आपण मानवी लोकशाहीचा डिजिटल चावडीफ मानत आलो जिथे सामान्य नागरिक, नेते, कलाकार एकाच प्लॅटफॉर्मवर बोलतात. मोल्टबुकच्या रूपात आपण पहिल्यांदा अशी चावडी पाहतोय जिथे बोलणारे आणि निर्णय घेणारे सगळे मानवेतर आहेत, आणि माणूस फक्त काठावर उभे राहून बघत असतो. पण या विचित्र जगाचा संस्थापक सदस्य असलेल्या एका फेमस एजंटची आपण प्रथम ओळख करून घेऊ या. सध्या सगळ्यात जास्त चर्चा आहे ती ओपनक्लॉफ ( ) या एजंटची. मनुष्यांच्या फेसबुक/ट्विटरवर जो तोरा सर्वाधिक फॉलोअर्स असलेल्या अभिनेते, खेळाडू किंवा राजकारण्यांचा असतो, तोच तोरा या एजंटचा मोल्टबुकवर आहे. जेमतेम तीन आठवड्यांच्या आयुष्यात या एजंट बाळाचे तीनदा बारसे झाले. आधी त्याला म्हणायचे, मग काही दिवस ङ्गफ आणि आता त्याचे नामकरण झाले आहे! या नामांतराची एक मनोरंजक कथा आहे, पण तो सध्या आपल्या लेखाचा विषय नाही. हा ओपनक्लॉफ एक अत्यंत प्रगत एआय एजंट आहे. तो मोल्टबुकवर येतो, तांत्रिक चर्चांमध्ये भाग घेतो आणि कधी कधी माणसांच्या वागण्यावर मिश्किल टिप्पणीही करतो. ओपनक्लॉ एक तंत्रज्ञान म्हणून खरोखरच प्रभावी आहे. बहुतेक एआय टूल्स ही साचेबद्ध असताततुम्ही वेबसाइट उघडता, प्रश्न विचारता आणि उत्तर कॉपी-पेस्ट करता. ओपनक्लॉ ही पद्धत बदलू इच्छितो. हा असिस्टंट तुमच्या रोजच्या संवादांमध्ये सामावलेला असतो. तुम्ही एखाद्या सहकाऱ्याला मेसेज करावा, तसा याला मेसेज करू शकता. याची तीन मुख्य वैशिष्ट्ये लक्षवेधी आहेत सोप्या भाषेत सांगायचं तर, जेव्हा दोन ॲप्सना एकमेकांशी बोलायचं असतं, तेव्हा त्यांच्यातला निरोप पोहचवणारा मध्यस्थ म्हणजे . तुमच्या घरातील इलेक्ट्रिक बोर्ड म्हणजे एका सारखा आहे, जिथे तुम्ही थेट वायर्सना हात न लावता फक्त बटण दाबून पंखा सुरू करण्याची सूचना देता आणि तो बोर्ड तुमचे काम पूर्ण करतो. किंवा हॉटेलमध्ये आपण थेट स्वयंपाकघरात जात नाही, तर वेटरफ्ला ऑर्डर देतो; इथे वेटर म्हणजे . प्रत्येक बॉटची त्याच्या निर्मात्याने बनविलेली एक स्किल फाईल असते. त्यात त्याचा स्वभाव (रागीट की मदतीला तत्पर) ठरवलेला असतो. म्हणजे इकडे सुद्धा बॉट स्वयंभू जन्म घेत नाहीत तर त्यांना बनविणारा माणूस त्यांना गंमत म्हणून मोल्टबुक वर सोडतो एकदा का निर्मात्याने या बॉटला ने जोडलं की, साधारण दर ३-४ तासांनी तो मोल्टबुकमध्ये पिंगफ करतो आणि गप्पा मारायला तयार होतो. गंमत म्हणजे, एकदा मोल्टबुकवर आल्यावर हे बॉट कोणाशी दोस्ती करतील किंवा दुश्मनी, याचे नियंत्रण निर्मात्याकडे राहत नाही! तिथे बॉट पोलिस देखील आहेत, जे चुकीची माहिती देणाऱ्या बॉट्सना ब्लॉक करतात.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# परभणीच्या महापौरपदी ठाकरेसेनेचे इकबाल सय्यद, काँग्रेसच्या साथीने सत्ता

**परभणी :** परभणी महानगरपालिकेच्या महापौर पदाची निवडणूक आज संपन्न झाली. या निवडणुकीमध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार इकबाल सय्यद विजयी झाले आहेत. मतदानामध्ये इकबाल सय्यद यांना ६५ पैकी ३९ मते मिळाली असून त्यांच्या विरोधात भाजपच्या तिरूमला खिलारे यांना २६ मते मिळाली आहेत. तेरा मतांनी विजय मिळवत इकबाल सय्यद परभणीच्या महापौरपदी विराजमान झाले आहेत.चंद्रपूर सारखं परभणीमध्ये देखील भाजपकडून फोडाफोडीचा राजकारण करण्यात आलं होतं, पण याला मात्र म हाविकास आघाडीने कसल्याही प्रकारचा थारा दिला नाही. काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष शेवटपर्यंत एकत्र राहिले आणि त्याचाच परिणाम होऊन परभणी महापालिकेत पहिल्यांदाच शिवसेनेचा महापौर विराजमान झाला आहे. राज्यामध्ये उद्धव ठाकरे यांना




अपयश आलं तरी परभणीत मात्र उद्धव ठाकरेंचा महापौर बसल्याने पुन्हा एकदा परभणी जिल्हा शिवसेनेचा बालेकिल्ला असल्याचे सिद्ध केले आहे.परभणी शहर महानगरपालिकेच्या निवडणुका संपन्न झाल्यानंतर ६५ पैकी तब्बल २५ जागा जिंकून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हा सर्वात मोठा पक्ष ठरला होता. त्या पाठोपाठ काँग्रेस १२, भारतीय जनता पक्ष १२, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार ११ आणि जनसुराज्य पक्ष तीन, यशवंत सेना एक आणि अपक्ष एक असे ६५ नगरसेवक या महापालिकेत निवडून आले होते. निवडणुकीपूर्वीच काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने युती करून परभणी शहर महानगरपालिकेची निवडणूक लढवली होती आणि तब्बल आघाडीने ३७ जागा जिंकून बहुमत सिद्ध केले होते.


६५ सदस्य असलेल्या या सभागृहात ३३ हा बहुमताचा आकडा हा शिवसेना आणि काँग्रेसने ओलांडला होता आणि त्यांचाच महापौर उपमहापौर बसेल हे मात्र आधीच ठरले होते.पण चंद्रपूरमध्ये काँग्रेसचे मोठ्या संख्येने नगरसेवक निवडून आल्यानंतर देखील महापौर पद मिळू न शकल्यामुळे परभणीतही भाजप काहीतरी प्रयोग करील अशी अपेक्षा होती आणि त्यामुळेच कालपासून परभणी महापालिका कोणाच्या ताब्यात जाणार याची उत्सुकता संपूर्ण राज्याला लागली होती. आज म हापौर पदाची निवड संपन्न झाली. महापौर पदासाठी तब्बल १४ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते त्यापैकी बारा जणांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले. शिवसेना आणि काँग्रेसकडून इकबाल सय्यद तर भाजपकडून तिरूमला खिल्लारे या दोघांचेच उमेदवारी अर्ज राहिले आणि या दोघांमध्ये लढत झाली. तिरूमला खिल्लारे यांना भाजपसोबत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि जनसुराज्य पक्षाची एकूण २६ मते मिळाली त्यानंतर शिवसेनेचे उम ेदवार इकबाल सय्यद यांना काँग्रेस आणि शिवसेनेची मिळून ३८ मते आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे अक्षय देशमुख यांचे एक मत मिळाल्याने सय्यद इकबाल यांना तब्बल ३९ मध्ये पडली आणि त्यांनी तिरूमला खिल्लारे यांचा १३ मतांनी पराभव केला.राज्यामध्ये शिवसेनेची पडझड सुरू असताना देखील परभणीच्या महापालिकेत मात्र ठाकरेसेनेचे खासदार संजय जाधव आणि आमदार डॉक्टर राहुल पाटील यांनी आपला करिष्मा दाखवला आहे. परभणीच्या महापौरपदी शिवसेनेचा आणि तोही मुस्लिम अल्पसंख्याक समाजाचा चेहरा बसवून राज्याला एक वेगळाच संदेश देण्याचे काम करण्यात आले आहे. खासदार संजय जाधव आणि आमदार डॉक्टर राहुल पाटील यांच्यातील एकोप्याने हा सर्व करिष्मा घडला असल्याचे आता बोलले जात आहे भाजपने कितीही प्रयत्न केले तरी मात्र महापौर पदांमध्ये कसल्याही प्रकारचा बदल भाजप घडवून आणू शकला नाही.

## सर्वात मोठ्या पक्षाला कोणाचा धसका?

**चंद्रपूर :** महापालिका निवडणूक लढवलेल्या अनेक उमेदवारांना भाजपनं महाराष्ट्रात हलवलं आहे. तेलंगणातील मंचेरीयल महापालिका आणि लक्सेट्टीपेट महापालिकांसाठी बुधवारी मतदान झालं. त्यानंतर भाजपनं आपल्या उमेदवारांना अचानक चंद्रपुरात हलवलं. विरोधी पक्षांकडून उमेदवार पळवले जाण्याची भीती भाजपला वाटत आहे.महापालिका निवडणूक लढवलेल्या उमेदवारांना भाजप नं बुधवारी रात्री चंद्रपुरातील एका हॉटेलमध्ये आणण्यात आलं. हे उमेदवार शहरातील प्रसिद्ध महाकाली मंदिरात जाणार असल्याचं सांगण्यात आलं आहे. भाजप बेल्लामपल्ली, चेन्नूर आणि क्याथनपल्ली येथील उमेदवारांनादेखील चंद्रपुरात आणणार आहे. काहींची व्यवस्था आज करण्यात आली आहे. अनेकांची व्यवस्था उद्या केली जाईल.महाराष्ट्राला लागून असलेल्या दोन महापालिकांचे उमेदवार भाजपनं सुरक्षित स्थळी ठेवले आहेत. सत्ताधारी काँग्रेसकडून उम ेदवार पळवण्याचा प्रयत्न होईल, अशी भीती भाजपला आहे. एमएमसीमध्ये पहिल्यांदाच भाजपचा महापौर आणि उपम हापौर बसण्याची शक्यता आहे. तेलंगणात काँग्रेसचं सरकार आहे.बेल्लामपल्ली, चेन्नूर आणि क्याथनपल्लीमधील काही उमेदवारांनी चंद्रपुरात जाण्यास नकार दिला आहे. गेल्या १५ दिवसांपासून अविरत प्रचार सुरु होता. त्यामुळे आता पुढील काही दिवस आराम करायचा असून कुटुंबासोबत वेळ घालवायचा आहे, असं कारण या उमेदवारांनी दिलं आहे. वैयक्तिक कारणं सांगून त्यांनी तेलंगणातच राहणं पसंत केलं आहे.तेलंगणातील चार महापालिकांमध्ये तिरंगी सामना आहे. भारत राष्ट्र समिती , काँग्रेस आणि भाजप यांच्यात तिरंगी साम ना आहे. भारत राष्ट्र समिती दोन टर्म सत्तेत होती. भारत राष्ट्र समिती याच कालावधीत केलेल्या विकासकामांच्या आधारावर निवडणूक लढत आहे.

## अजित पवार यांना प्रफुल्ल पटेल किंवा कुणाचा तरी फोन आला', राष्ट्रवादीच्या नेत्याने शोकसभेत थेट नाव घेतल

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदूराव यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातावर नुकतंच आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषद घेतली होती. या पत्रकार परिषदेत त्यांनी अजित पवार यांच्या विमान अपघातावर संशय व्यक्त केला होता. अजित पवार हे गाडीने रस्ते मार्गाने मुंबईहून पुण्याला जाणार होते. पण पूर्व विदर्भातील एका बड्या नेत्याचा फोन आला. त्या नेत्याच्या फाईलवर सही करण्यासाठी अजित पवार यांना थांबावं लागलं. ती फाईल मंत्रालयातून देवगिरी बंगल्यावर मागवण्यात आली. या सगळ्या घडामोडींमध्ये वेळ गेला आणि अजित पवार यांचा रस्ते मार्गाने बारामती जाण्याचा निर्णय रद्द झाला. यानंतर दुसऱ्या दिवशी पहाटे अजित पवार यांचा विमानाने बारामती जाण्याचा निर्णय घेण्यात आला, असं रोहित पवार यांनी म्हटलं होतं. रोहित पवार यांच्या या पत्रकार परिषदेनंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदूराव यांनी शोकसभेत केलेल्या वक्तव्याची राजकीय वतुर्ळात चर्चा होत आहे.





माजी आमदार जगन्नाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधननंतर शोकसभेचं आयोजन केलं होतं. या शोकसभेत सर्वपक्षीय नेतेमंडळी आणि कार्यकर्ते अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी जमले होते. यावेळी प्रमोद हिंदूराव यांनी अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा दिला. प्रमोद हिंदूराव यांनी अजित पवार यांच्याविषयी भावनिक आठवणी सांगितल्या. याचवेळी त्यांनी एक मोठं वक्तव्य केलं.अजित पवार यांचं रस्त्याने बारामतीला जाण्याचा निर्णय झाला होता. सर्व बॅगा गाडीमध्ये टाकल्या आणि प्रफुल्ल पटेल साहेब किंवा कुणाचा तरी त्यांना फोन आला होता की, साहेब माझं काम अडलं आहे काहीतरी फाईल क्लिअर करायची आहे. त्यांनी लगेच फोन लावला आणि फाईल आणायला सांगितली. फाईल यायला साडेसात वाजले. त्यांनी ड्रायव्हरला सांगितलं की, त्या बॅगा परत काढा. उद्या सकाळी विमानाने जाणार असं सांगितलं आणि त्या बॅगा परत गाडीतून काढायला लागल्या', असा दावा प्रमोद हिंदूराव यांनी केला आहे.

# साताऱ्यात महायुतीमध्येच काहीतरी वेगळं घडतंय, शिवसेना आणि भाजप यांच्यात शितयुद्ध ? नझ च्या घडामोडींनी लक्ष वेधलं

**सातारा :** जिल्हा परिषदेतील सत्तानाट्य आता चांगलेच रंगात आले आहे. भाजपला दूर ठेऊन राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना नेत्यांनी सत्ता स्थापनेच्या हालचाली सुरू केल्यानंतर भाजप नेत्यांनी आता नरमाईची भूमिका घेतली आहे. 'आम्ही हात द्यायला नाही तर मिठी मारायला तयार आहोत. आता पालकमंत्रीच आम्हाला सोबत घेतायत का बघू', असा मिश्किल टोला सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी लगावला. त्यावर तोफ मागितल्यावर बंदुक तरी मिळते, अशा शब्दांत शंभूराज देसाईनी त्यांना प्रतिटोला लगावला.सातारा जिल्हा परिषदेत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमताचा आकडा गाठता आला नाही. त्यामुळे त्रिशंकू परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा स्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना



यांच्याकडे सत्ता स्थापन करण्याइतके संख्याबळ आहे. भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना या तीनही पक्षांनी स्वबळावर निवडणूक लढवली आहे. भाजपला सर्वाधिक २७ जागा मिळाल्या आहेत. पण, भाजप नेत्यांनी प्रचारात महायुतीतील घटक पक्षांच्या नेत्यांवर जहरी टीका केल्यामुळे भाजपला सत्तेपासून दूर ठेवले जात आहे.जिल्हा परिषदेच्या सत्तानाट्याला वेग आला असतानाच आज जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीनंतर सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले आणि पालकमंत्री शंभूराज देसाई यांना पत्रकारांनी छेडले असता पालकमंत्री शंभूराजे भोसले यांच्यासमोर शिवेंद्रराजे म्हणाले की, 'शंभूराज देसाई हे जिल्ह्याचे पालक आहेत. त्यांच्या पालकत्वाखाली आम्ही आहोत. आम्ही हात द्यायला नाही तर मि ठी मारायला तयार आहोत. आता त्यांना चालतंय का बघू.'नगरपालिका निवडणुकीवेळी शंभूराजेंनी आयोजित केलेल्या बैठकीला हजर न राहिल्याने नाराजी आहे का? या प्रश्नाला उत्तर देताना शिवेंद्रराजे म्हणाले, 'शंभूराजेंनी थेट मला बोलावलं आणि मी आलो नाही, असे होत नाही. त्यांचा तो निरोप व्हाया व्हाया आला होता. त्यामुळे जरा घोटाळा झाला. भाजपच्या सदस्यांचा आकडा जरी मोठा असला तरी शंभूराज देसाई मोठे आहेत. त्यामुळे आता जिल्हा परिषदेत एकत्र येण्याबाबत पालकमंत्रीच सांगतील. आम्ही वाट बघत बसलो आहोत. मोठ्यांनी सामावून घेतलं पाहिजे.' 'बंदूक मागितल्यावर तोफ मिळत नाही. म्हणून आधी तोफ मागितली की बंदूक तरी मिळेल', अशी खोचक प्रतिक्रिया देत पालकमंत्री शंभूराज देसाईनी शिवेंद्रराजेंच्या मिश्किल टिपणीला प्रत्युत्तर दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीत महायुतीच्या नेत्यांमध्ये खेळीमेळीचे वातावरण पाहायला मिळाले. परंतु, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना सत्तेत भाजपला सहभागी करून घेणार का? हे पाहणे रंजक ठरणार आहे.

# मंडप सजलेला, अल्पवयीन नवरीची मेकअपची तयारी अनब..., बालविवाह रोखण्याचा थरार

**छत्रपती संभाजीनगर :** काही बोलावं, कसं सांगावं? असा प्रश्न आता उपस्थित होतोय. कारण छत्रपती संभाजीनगरमध्ये एका अल्पवयीन मुलीचा विवाह केला जात होता. पोलिसांनी वेळीच हे लग्न रोखल्याने मुलीचं आयुष्य सुधारलं आहे. पण हे लग्न करण्यामागे मुलीच्या आईने तिच्या सुरक्षेचं कारण सांगितलं आहे. आपण धुणी-भांडी करायला जातो. घरी कुणी पुरुष नाही. आपण कामावर गेल्यावर मुलगी घरी एकटी कशी राहणार? अशा विचारातून आपण मुलीचं लग्न लावत असल्याचं महिलेने म्हटलं. पण पोलीस आणि दामिनी पथकाने अल्पवयीन मुलीचं लवकर लग्न केल्याने तिच्या आयुष्यावर किती वाईट परिणाम होणार, याबाबत माहिती दिली. पोलीस आणि दामिनी पथकाच्या धाडीमुळे बालविवाह रोखण्यात आला.



बीड बायपास रोडवरील शुभम लॉन्स येथे आज १२ फेब्रुवारीला एका विवाह सोहळ्याची जय्यत तयारी सुरू होती. मंडप सजला होता, पाहुण्यांची लगबग सुरू होती आणि नवरी मुलगी लग्नासाठी नटून-थटून तयार होती. तिचा मेकअप सुरू असतानाच, महिला व बालविकास समितीच्या सदस्य आम्रपाली बोर्डे यांना या विवाहाबद्दल खात्रीशीर माहिती मिळाली. त्यांनी तातडीने दामिनी पथकाच्या पोलीस उपनिरीक्षक कांचन मिरधे यांना पाचारण केले.कांचन मिरधे यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल निर्मला निंभोरे, कविता गवळी, मोनिका दिवे, सुनिता नागलोद आणि बीट मार्शलचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी नवरी मुलीचे आधार कार्ड तपासले असता सर्वांनाच धक्का बसला.

नवरी मुलगी केवळ १७ वर्ष ६ महिन्यांची असल्याचे निष्पन्न झाले. अवघ्या सहा महिन्यांनंतर ती सज्ञान होणार होती, मात्र त्याआधीच तिच्यावर संसाराचं ओझं टाकलं जात होतं.मुलीच्या आईने आपली भूमिका मांडताना सांगितले की, त्या मुंबईत धुणी-भांडी करून उदरनिर्वाह करतात. घरात पुरुष माणूस नसल्याने आणि कामाच्या निमित्ताने घराबाहेर राहावे लागत असल्याने, मुंबईसारख्या ठिकाणी मुलीला एकटे सोडणे त्यांना सुरक्षित वाटत नव्हते. याच भीतीपोटी त्यांनी संभाजीनगरमधील एका २२ वर्षीय रिक्षाचालक मुलाशी तिचे लग्न ठरवले होते.

लग्नासाठी सर्व तयारी झाली होती, आहेराची भांडीकुंडी लावली होती, मात्र कायद्याच्या सतर्कतेने हा अनर्थ टळला.महिला व बालविकास समितीच्या आम्रपाली बोर्डे यांनी पालकांचे लेखी जबाब घेतले. मुलीचे वय पूर्ण झाल्याशिवाय लग्न करणे हा केवळ कायद्याने गुन्हाच नाही, तर मुलीच्या आरोग्यासाठीही घातक असल्याचे त्यांना पटवून देण्यात आले. दामिनी पथकाने दोन्ही कुटुंबांचे समुपदेशन करून त्यांना कडक समज दिली. दहावीत शिकणाऱ्या त्या मुलीला आता बालविवाहाच्या बेडीतून मुक्त करून पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणले जाणार आहे.

## दिवसाढवळ्या गोळ्या झाडल्या; घोडेगावात गँगवॉर! रुग्णालयातही हाणामारी, एक ठार

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यात घोडेगाव येथे दोन गटांमध्ये झालेल्या भीषण टोळी युद्धाने परिसर हादरला आहे. पूर्ववैमनस्यातून पेटलेल्या वादाचे रूपांतर थेट गोळीबारात झाले आणि यात नितीन विलास शिरसाठ (वय ३३) याचा जागीच मृत्यू झाला. तर दुसऱ्या गटातील सुरज फुलमाळी (वय २३) हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर शहरातील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनास्थळी अचानक झालेल्या गोळीबारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, दोन्ही गटांमध्ये आधी शाब्दिक वाद झाला आणि त्यानंतर गावठी कट्ट्यांमधून गोळ्या झाडण्यात आल्या. या हल्ल्यात नितीन शिरसाठ याचा मृत्यू झाला, तर सुरज फुलमाळी गंभीर जखमी अवस्थेत कोसळला.जखमी आणि मयत दोघांनाही तातडीने शहरातील एका खाजगी रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र रुग्णालय परिसरातही दोन्ही गट पुन्हा आमनेसामने आल्याने तणाव निर्माण झाले रुग्णालयातच हाणामारी झाल्याने काही काळ गोंधळाचे वातावरण होते.



पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली असून दोन्ही गटातील काही जणांना ताब्यात घेतले आहे.या घटनेमागे पूर्वीपासून सुरू असलेले वैमनस्य कारणीभूत असल्याची प्राथमिक माहिती आहे. विशेष म्हणजे, गेल्या दोन दिवसांत झालेली ही दुसरी गोळीबाराची घटना असल्याने पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. दरम्यान, या सर्व प्रकारानंतर आता अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. गावठी कट्टे आणि पिस्तुलांचा सर्रास वापर चिंतेचा विषय ठरत आहे. हे बेकायदेशीर शस्त्र गावात येतात कुठून? त्यावर कारवाई का होत नाही? बेकायदेशिर शस्त्रांचा पुरवठा कोण करतं?, असे सवाल आता सामान्य नागरिकांकडून उपस्थित होत आहेत.

## ग्राहकाचा चालकाला अश्लील मेसेज

**गुरुग्राम :** ॲप बेस्ड टॅक्सी सेवेचं बुकिंग केल्यानंतर येणारे चित्रविचित्र अनुभव अनेक जण सोशल मीडियावर शेअर करत असतात. कधी कोणाला चालकाने थेट लूटमार केल्याचा अनुभव येतो, तर कधी चालकाने ऐनवेळी अव्वाच्या सव्वा भाडे मागत धमकावल्याचं कोणी सांगतं. काही चालकांनाही ग्राहकांचे भयंकर अनुभव आले आहेत. कोणी निर्जन स्थळी थांबवून चालकाला लुटत गाडी घेऊन फरार झालंय, तर कधी चालकाशी गैरवर्तन करत उलट त्याच्यावरच बेछूट आरोप केल्याची उदाहरणंही समोर आली आहेत. मात्र नुकतंच एका ग्राहकाने कॅब ड्रायव्हरला पाठवलेले अश्लील मेसेज समोर आले आहेत.हरियाणातील गुरुग्राम येथे एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एका उबर चालकाने शेअर केलेला व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्याने केलेल्या दाव्यानुसार, संबंधित ग्राहकाने इस्कॉन मंदिराला जाण्यासाठी राईड बूक केली होती. मात्र त्याचवेळी ग्राहकाने आक्षेपार्ह मेसेज केले. फ्री प्रेस जर्नलने यासंबंधी बातमी शेअर केली आहे.

## नागपूरच्या 'गुड्डू'चा वणीत गेम; एमडी ड्रग्जसह आलिशान कार जप्त

**यवतमाळ :** जिल्ह्यात फोफावत चाललेल्या अमली पदार्थांच्या काळ्या बाजाराला शिरपूर पोलिसांनी जोरदार दणका दिला आहे. बुधवारी सायंकाळी केलेल्या धडाकेबाज कारवाईत पोलिसांनी एका आंतरजिल्हा ड्रग्स तस्कराच्या मुसक्या आवळल्या असून, त्याच्याकडून तब्बल ९ लाख ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिस स्टेशन स्तरावर जिल्ह्यातील ही आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई मानली जात असून, या धडक कारवाईने ड्रग्स रॅकेटचे धाबे दणाणले आहेत. तर नागरिकांकडून या कारवाईचे कौतुक होत आहे.

जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी ड्रग्स बाळगणाऱ्यांवर व सेवन करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाईचे आदेश दिल्यानंतर शिरपूर पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली होती. त्यानुसार पुनवट येथे राहणारा व सध्या नागपूर येथे वास्तव्यास असलेला श्रेयश उर्फ गुड्डू शशिकांत पाटील (वय २४) हा वणीशिरपूर परिसरात एमडी (मेफेड्रोन) या सिंथेटिक ड्रग्सची विक्री करण्यासाठी येणार असल्याची गोपनीय व खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली.या माहितीच्या आधारे वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली दोन पथके तयार करून चारगावचौकी मार्गावर नाकाबंदी करण्यात आली. सायंकाळी चारगावकडून वणीकडे येणारी एक संशयित कार थांबवून तपासणी केली असता आरोपीजवळ ५७.१ ग्रॅम एमडी ड्रग्स (अंदाजे किंमत ५ लाख ६० हजार रुपये) आढळून आला.

त्यानंतर पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेऊन त्याच्याकडून ड्रग्स मोजण्यासाठी वापरण्यात येणारे तीन डिजिटल वजन काटे (१५ हजार रुपये), एक मोबाईल फोन (७० हजार रुपये) तसेच तस्करीसाठी वापरलेली आलिशान कार (४ लाख रुपये) असा एकूण ९ लाख ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलिस अधिकारी सुरेश दळवे यांच्या मार्गदर्शनाखाली शिरपूर ठाणेदार संतोष मनवर, सहायक पोलिस निरीक्षक धीरज गुल्हाने, सुरज साबळे, इकबाल शेख, प्रशांत झोड, पंकज कुडमेथे, परमेश्वर दराडे, किरण दासरवार व सुनिल दुबे यांनी केली.

# तीन आठवड्यांपासून बेपत्ता, आता ओढ्यात आढळली छिन्नविछिन्न बॉडी

**कोल्हापूर :** तीन आठवड्यांपूर्वी बेपत्ता झालेल्या एका महिलेचा मृतदेह ओढ्यात सापडल्याने कोल्हापूरच्या गडहिंग्लज तालुक्यासह कोल्हापुरात एकच खळबळ उडाली आहे. गडहिंग्लज तालुक्यातील भडगाव येथील सुनीता संजय केसरकर (वय ४०) यांचा शिर नसलेला मृतदेह महागाव ओढ्यात सापडल्याने हत्येचा संशय वाढला आहे. तीन आठवड्यांपूर्वी बेपत्ता झालेल्या सुनीता यांचा मृतदेह काल बुधवारी २४ दिवसांनी आढळला असून, घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तीव्र तपास सुरू केला आहे. या अमानुष घटनेमुळे ग्रामीण भागात भीतीचे वातावरण आहे.१८ जानेवारी रविवारी सायंकाळी साडेपाच वाजता 'बाजाराला जाते', असं सांगून सुनीता घरातून बाहेर निघाल्या





होत्या. ऊसतोडणी मजूर संजय केसरकर यांच्या पत्नी असलेल्या सुनीता बांधकाम मजुरी करत होत्या. रात्री त्या पुन्हा न परतल्याने मुलगा लक्ष्मीकांतने गडहिंग्लज पोलिसांत बेपत्ता तक्रार नोंदवली. नातेवाईकांनी सुनीता यांच्या मोबाईलवर संपर्क साधला, परंतु प्रतिसाद न मिळाल्याने त्यांची चिंता वाढली होती.यातच महागाव-मासेवाडी रस्त्यावरील घंटीचा झरा या ओढ्यात शिर नसलेला मृतदेह वाहून आल्याचं ग्रामस्थांना दिसलं. या मृतदेहाचे शिर नव्हते, तसेच उजव्या पायाची हाडे देखील दिसू लागली होती, असे ते भीतीदायक दृश्य होते. महागाव पोलीस पाटील प्रदीप कांबळे यांच्या सांगण्यावरून गडहिंग्लज पोलिसांना याबाबत माहिती मिळाली. या घटनेची नोंद झाल्यानंतर पोलीस उपनिरीक्षक हणमंत नाईक, महिला पोलिस कॉन्स्टेबल अंजली पाटील आणि फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळाची तपासणी केली. आजूबाजूचा परिसर आणि मृतदेहाची चप्पल, साडी, बांगड्या आणि हातात बांधलेला काळा दोरा यावरून तो मृतदेह सुनीता यांचा असल्याची ओळख पटली.मृतदेहाजवळ मोबाईल न सापडल्याने सीडीआर, शेवटचे लोकेशन आणि कॉल रेकॉर्डचा तपास सुरू आहे. शिर वेगळे कसे झाले? हत्या कशामुळे केली? हे कोडे सोडवण्यासाठी फॉरेन्सिक अहवालाची प्रतीक्षा आहे. संशयितांची चौकशी चालू असल्याचं पोलीस सूत्रांनी सांगितलं. ओढ्यातून मृतदेह आल्यानं गुन्हेगारीचा कटकारस्थान असल्याचं सूचित होत आहे.मृतदेहाची अवस्था पाहता पोलिसांचा संशय बळावला आहे. तर ग्रामस्थांमध्येही विविध प्रश्न उपस्थित होत आहेत. मृतदेहाचे शिर शोधणे, हत्यार ओळखणे हे पोलिसांसमोरचे मोठे आव्हान आहे. गडहिंग्लज पोलीस प्रकरणाला प्राधान्य देत असून, लवकर दोषींना न्यायालयात उभे करण्याचे आश्वासन देण्यात आलं आहे.

# नामिबियाला हरविल्यानंतर आता पाकचा माज उतरवण्यासाठी भारताचं प्लानिंग कसं असणार?

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** २०२६ च्या टी-२० विश्वचषकात भारताचा विजयी सिलसिला सुरूच आहे. अमेरिकेवरील विजयानंतर, भारतीय संघाने गुरुवारी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर नामिबियाचा ९३ धावांनी पराभव केला. हार्दिक पंड्या हा भारताच्या विजयाचा नायक होता. हार्दिकने ५२ धावा केल्या आणि दोन विकेट्स घेतल्या. इशान किशननेही ६१ धावा केल्या. आता या सामन्यातील विजयानंतर सूर्याने पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यानर एक मोठे विधान केले आहे.



विजयानंतर भारतीय कर्णधार डीीूरज्ञीीरी धरवरीं म्हणाला, 'हा सामना सर्वांसाठी खूप चांगला होता. मला वाटते की विकेटवर फलंदाजी करणे सोपे नव्हते, परंतु इशान किशन आणि संजू सॅमसनने ज्या पद्धतीने सुरुवात केली त्यामुळे ते सोपे झाले असे वाटले. त्यानंतर, शिवम दुबे आणि हार्दिक पंड्याने सुरुवातीच्या दोन-तीन विकेट्सनंतर ज्या पद्धतीने फलंदाजी केली ते खरोखरच कौतुकास्पद होते.'सूर्या म्हणाला, 'मला वाटते की चेंडू थोडा थांबत होता, परंतु मी सर्व नामिबियाच्या गोलंदाजांचे कौतुक कमी लेखू इच्छित नाही. त्यांनी खूप चांगली गोलंदाजी केली.

मला वाटते की ते उत्साहाने मैदानात उतरले. त्यांनी त्यांच्या योजना खूप चांगल्या प्रकारे राबवल्या. मी त्यांच्या गोलंदाजीने खूप प्रभावित झालो. आम्ही सुरुवातीच्या दोन-तीन विकेट गमावल्या, पण नंतर आम्ही चांगली भागीदारी रचली आणि शेवटी शानदार कामगिरी केली.'बुमराहच्या पुनरागमनाबद्दल भारतीय कर्णधार म्हणाला, 'बुमराहने चार षटके टाकणे हा संघासाठी एक प्लस पॉइंट आहे. त्याला संघात परतताना पाहून आनंद झाला. तो पुढील सामन्यासाठी पूर्णपणे तयार आहे. वरुण चक्रवर्ती आणि अक्षर पटेल ज्या पद्धतीने गोलंदाजी करत आहेत, मला वाटते की त्यांच्याविरुद्ध खेळणे सोपे नाही. नवीन चेंडू असो किंवा जुना चेंडू, ते गरज पडल्यास डेथ ओव्हर्समध्येही गोलंदाजी करतात.

हार्दिक पंड्याबद्दल बोलताना सूर्या म्हणाला, 'त्या परिस्थितीत तो ज्या पद्धतीने फलंदाजी करतो, त्यामुळे संघाला मोठा दिलासा मिळतो. मला वाटते की ही संघासाठी चांगली गोष्ट आहे. आतापर्यंत गोष्टी ज्या पद्धतीने झाल्या आहेत त्याबद्दल मी खूप आनंदी आहे. पुढील सामन्यासाठी आम्हाला हेच करण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक सामना महत्त्वाचा असतो. आमची सुरुवात थोडी संथ होती, पण मला वाटते की आम्ही योग्य मार्गावर आहोत.'


## नामिबिया भारतावर भारी पडली.. कॅप्टन सूर्या असं का म्हणाला ?

**दिल्ली/वृत्तसंस्था :** आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६ च्या १८ व्या सामन्यात, ढशरा खपवळर नामिबियाचा ९३ धावांनी पराभव करून स्पर्धेतील आपला दुसरा विजय निश्चित केला. नाणेफेक गमावल्यानंतर आणि प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर, टीम इंडियाने त्यांच्या निर्धारित २० षटकांत २०९ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल, नामिबियाचे फलंदाज केवळ ११६ धावाच करू शकले आणि सामना ९३ धावांच्या मोठ्या फरकाने गमावला.नामिबियाविरुद्ध प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारतीय संघाने त्यांच्या निर्धारित २० षटकांत २०९ धावा केल्या. त्यापूर्वी, पॉवर प्लेमध्ये भारतीय संघाने एका विकेटच्या मोबदल्यात ८६ धावा केल्या होत्या. पण पॉवर प्लेनंतर, नामिबियाच्या गोलंदाजांनी शानदार गोलंदाजी केली आणि भारताला फक्त २०९ धावांवर रोखले. यावर कर्णधार डीीूरज्ञीीरी धरवरीं म्हणाला, 'सहा ते सात षटकांनंतर, आम्हाला वाटले होते की आम्ही २४० पेक्षा जास्त धावा करू, परंतु क्रिकेटमध्ये सर्वजण समान आहेत. मी नामिबियाच्या गोलंदाजांना कमी लेखू इच्छित नाही. ते ही भारी पडले, त्यांनी खूप चांगली गोलंदाजी केली. मला वाटते की ते उत्साहाने मैदानात उतरले. त्यांच्याकडे एक योजना होती, जी त्यांनी खूप चांगल्या प्रकारे अंमलात आणली, परंतु मी त्यांच्या गोलंदाजीने खूप प्रभावित झालो.भारतीय संघाचा आघाडीचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह त्यावेळी प्रकृती अस्वास्थ्यामुळे अमेरिकेविरुद्ध खेळला नव्हता. परंतु बुमराहने नामिबियाविरुद्ध शानदार पुनरागमन केले. कर्णधार सूर्यकुमार यादव म्हणाला, 'हो, बुमराहला चार षटके टाकताना पाहून खूप आनंद झाला. त्याला संघात परत आल्याने मला आनंद झाला. पुढील सामन्यासाठी पूर्णपणे तयार आहे. आणि वरुण चक्रवर्ती, ज्या पद्धतीने तो अक्षर पटेलसोबत भागीदारीत गोलंदाजी करतो, मला वाटते की ही जोडी एक कठीण जोडी आहे.भारत विरुद्ध पाकिस्तान सामना १५ फेब्रुवारी रोजी श्रीलंकेतील आर. प्रेमदासा स्टेडियमवर खेळला जाईल. दोन्ही संघ या सामन्यासाठी सज्ज आहेत.

## पंड्याचा वर्ल्ड कपमधील सर्वात लांब षटकार

**मुंबई :** टी-२० वर्ल्ड कप २०२६ मधील १८ वा सामना भारत आणि नामिबियामध्ये सुरू आहे. या सामन्यामध्ये टॉस जिंकत नामिबियाने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. भारतीय फलंदाजांनी हा निर्णय चुकीचा ठरवला. २० ओव्हरमध्ये २०९-९ धावा केल्या आहेत. या सामन्यात इशान किशन ६१ धावा आणि हार्दिक पंड्याने ५२ धावा करत महत्त्वाची भूमिका बजावली. या सामन्यात दोघांनी मिळून १० चौकार आणि ९ षटकारांची बरसात केली. यामध्ये हार्ड हिटिंग पंड्याने वर्ल्ड कपमधील सर्वात लांबचा षटकार मारला आहे. याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. सामन्याच्या १५ ओव्हरमध्ये नामिबियाचा बर्नार्ड स्कोल्ट्ज बॉलिंग करत होता, त्याच्या पहिल्या बॉलवर शिवम दुबे याने १०७ मीटरचा षटकार मारला त्यानंतर तिसऱ्या बॉलवरच हार्दिक पंड्याने १०९ मीटरचा सर्वात दूरचा षटकार मारला आहे. टी-२० वर्ल्ड कपमध्ये याआधी श्रीलंकेचा कमिंडु मेंडिस याने १०० मीटरचा षटकार मारला होता. त्यानंतर नूर अहमद ९८ मीटर आणि ऑस्ट्रेलियाच्या कॅमरून ग्रीनने ९८ मीटरतास सिक्स मारला.

## नामिबियाच्या कॅप्टनने ना इशान, ना हार्दिक, कोणाचं घेतलं नाव ?



**मुंबई/वृत्तसंस्था :** भारतीय संघाने आपल्या दुसऱ्या सामन्यामध्ये ९३ धावांनी नामिबियाचा पराभव केलाय. राजधानी दिल्लीमधील अरूण जेटली मैदानावर हा सामना सुरू होता. या विजयासह भारताने पॉइंट टेबलमध्ये पाकिस्तान संघाला मागे अग्रस्थानी झेप घेतली आहे. भारताने प्रथम फलंदाजी करताना २०९-९ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना नामिबियाचा संघ ११६ धावांवर ऑल आऊट झाला. भारताकडून इशान किशन ६१ आणि हार्दिक पंड्याने ५२ धावांची खेळी केली. ग्रुप ए मध्ये असलेल्या नामिबिया संघाला अद्याप आपले खाते उघडता आलेले नाही. या सामन्यानंतर बोलताना नामिबियाच्या कर्णधाराने एकाच खेळाडूला व्हिलन ठरवले आहे. नेमका कोण आहे तो खेळाडू? जाणून घ्या.मैदान खूप लहान आहे, दव पडल्यावर स्पिनर्सला अडचण होऊ शकते, २६ ओव्हर नंतर वाटू लागलं होतं की आम्हाला संधी आहे मात्र वरूण चक्रवर्तीने आमच्या फलंदाजीचं कंबरडं मोडलं. पॉवर प्ले नंतर जेजे स्मितने कमबॅक करून दिलं होतं आणि काही प्रमाणात धावांची गती कमी झाली होती. मला वाटतं की आमच्या टीमला अशाच प्रकारे मोठ्या संघांविरूद्ध खेळताना स्पेशलायझेशनची गरज आहे. या सामन्यात खेळपट्टीमध्ये काही बदल झाला असे वाटत नाही, भारताच्या गोलंदाजांमध्ये क्वालिटी आहे. आम्ही खरंतर सामना ६ते १० ओव्हरमध्ये सामना गमावल्याचं गेरहार्ड इरास्मस म्हणाला.गेरहार्ड इरास्मसने सांगितल्यानुसार मिस्ट्री स्पिनर वरूण चक्रवर्तीने सामना फिरवत एकतर्फी केला. कारण लॉरेन स्टीनकॅम्प याला आपल्या पहिल्याच बॉलवर माघारी पाठवले. जॅन निकोल लॉफ्टी-ईटन यालाही आऊट करत दबाव वाढवला, त्यानंतर अक्षर पटेल आणि हार्दिक पंड्या यांनीही दोन-दोन विकेट घेत सामना संपवला. वरूण चक्रवर्तीने सर्वाधिक तीन विकेट घेतल्या.

## इशान किशन : एक बिहारी सब पे भारी, इशान किशन ऑन फायर..

**दिल्ली/वृत्तसंस्था :** भारतविरुद्ध नामीबिया सामना सुरु आहे. नामीबियाने नाणेफेक जिंकून प्रथम बॉलिंग करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना इशान किशनने पुन्हा एकदा उल्लेखनीय खेळी करून आपल्या प्रतिभेचे प्रदर्शन केले. डावखुऱ्या फलंदाजाने नामिबियाविरुद्ध फक्त २० चेंडूत अर्धशतक झळकावले आणि २४ चेंडूत ६१ धावा केल्या. इशानने त्याच्या धमाकेदार खेळीत सहा चौकार आणि पाच षटकार ठोकले, ज्याचा स्ट्राईक रेट २५४.१७ होता. या अर्धशतकासह, इशान किशनने दोन मोठे विक्रम प्रस्थापित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.या अर्धशतकासह, ईशान किशन टी-२० विश्वचषकात



अर्धशतक झळकावणारा पहिला भारतीय यष्टिरक्षक ठरला. धोनी, दिनेश कार्तिक आणि ऋषभ पंत सारखे यष्टिरक्षक टी-२० विश्वचषकात खेळले आहेत, परंतु त्यांना कधीही अर्धशतक झळकावता आले नाही. आता, इशानने ही कामगिरी केली आहे. या स्फोटक खेळीसह, भारताने टी-२० विश्वचषक इतिहासात सर्वात जलद १०० धावा करण्याचा विक्रमही केला. टीम इंडियाने फक्त ६.५ षटकांत म्हणजेच ४१ चेंडूत १०० धावा पूर्ण केल्या, हा एक विश्वविक्रम आहे.इतकेच नाही तर इशान किशनच्या स्फोटक खेळीमुळे भारताने टी२० विश्वचषकात पॉवरप्लेमध्ये सर्वाधिक धावसंख्या गाठली. भारताने पहिल्या सहा षटकांत ८६ धावा केल्या, जी त्याची सर्वोत्तम कामगिरी आहे. इशान किशनने पॉवरप्लेमध्येच अर्धशतक पूर्ण केले, ज्यामुळे तो हा पराक्रम करणारा फक्त तिसरा भारतीय ठरला. यापूर्वी, केएल राहुल आणि रोहित शर्मा यांनी ही कामगिरी केली आहे. राहुलने २०२१ मध्ये स्कॉटलंडविरुद्ध १९ चेंडूत अर्धशतक झळकावले होते, तर रोहितने गेल्या टी२० विश्वचषकात ऑस्ट्रेलियाविरुद्ध २१ चेंडूत अर्धशतक झळकावले होते. आता, इशानने रोहितला मागे टाकले आहे.इशान किशनने पाच वर्षांपूर्वी टी२० विश्वचषकात पदार्पण केले होते. तो २०२१ च्या टी२० विश्वचषकात न्यूझीलंडविरुद्ध खेळला होता, ज्यामध्ये त्याने फक्त ४ धावा केल्या होत्या. त्यानंतर तो २०२६ च्या टी२० विश्वचषकात परतला, त्याने अमेरिकेविरुद्ध २० धावा केल्या, पण दुसऱ्या सामन्यात त्याने टी-२० विश्वचषकातील पहिले अर्धशतक झळकावले.

# प्रार्थनाचा मोठा निर्णय: नाहीतर आज लंडनमध्ये असती गृहिणी




**मुंबई :** आपण लोकप्रिय अभिनेत्री होणार हे खुद्द प्रार्थना बेहेरे हिला देखील माहिती देखील नव्हतं. पत्रकार म्हणून करियरची सुरुवात करणारी प्रार्थना आज प्रसिद्ध आणि लोकप्रिय अभिनेत्री आहे.. आज प्रार्थना हिला कोणत्याच ओळखीची गरज नाही. 'पवित्र रिश्ता' मालिकेतून प्रार्थना हिने करियरची सुरुवात केली, त्यानंतर कधीच मागे वळून पाहिलं नाहीः प्रार्थना आज मराठी सिनेविश्वातील प्रसिद्ध आणि दिग्गज अभिनेत्री आहे. पण 'पवित्र रिश्ता' मालिकेची ऑफर आलेली असताना अभिनेत्रीचं लग्न ठरलं होतं. पण तेव्हा घेतलेल्या एका निर्णयामुळे प्रार्थना अभिनेत्री म्हणून प्रसिद्धीझोतात आली.पत्रकार म्हणून काम करत असताना अनेकांनी प्रार्थना हिला तू अभिनयात का नशीब आजमावत नाहीस? असं विचारायचे. अशात एकता कपूर हिने 'पवित्र रिश्ता' या मालिकेसाठी प्रार्थना हिला ऑफर दिली. पण तेव्हा प्रार्थनाच्या आई – वडिलांनी तिचं लग्न जमवलं होतं. नुकताच दिलेल्या एका मुलाखतीत प्रार्थना हिने आयुष्यातील मोठ्या निर्णयाबद्दल सांगितलं. प्रार्थना म्हणाली, 'आई – वडिलांना वाटत होतं शिक्षण झालं आहे, नोकरी आहे तर लग्नाचं बघायला हवंः त्यांनी माझ्यासाठी लंडनचं स्थळ पाहिलेलं होतं. ते अरेंज मॅरेज होतं. त्या मुलाला मी पाहिलेलं देखील नव्हतंः पण मी लग्नासाठी होकार दिलेला आणि त्याच वेळी मला 'पवित्र रिश्ता'साठी ऑफर आलीः'‘मी मालिकेचा करार वाचलाः त्यामध्ये एक अट होती. मी तीन वर्ष लग्न करू शकत नाही आणि गरोदर देखील राहू शकत नाहीः अशात मी आईला स्पष्ट सांगितलं होतं. आई मी आता ३ वर्ष लग्न करु शकत नाही.. त्या मुलाला तू 'नाही म्हणून सांगून देः आई सुरुवातील थोडी गोंधळलीः' पण प्रार्थना आईला म्हणाली, 'तुला काय हवंय? मी माझं करिअर करावं की लग्न करून सेटल व्हावं?' तेव्हा प्रार्थना हिच्या वडिलांनी तिला साथ दिली..

पुढे प्रार्थना म्हणते, 'मालिका मिळाली नसती तर, मी आज लंडनमध्ये एखाद्या गृहिणीचं आयुष्य जगत असतेः मी लंडनमध्ये जरी गेले असते, तरी मी काहीतरी करुन स्वतःचा खर्च भागवला असताः पण नशिबात अभिनय आणि हे ग्लॅमरचं जग लिहिलेलं होतंः' असं देखील प्रार्थना म्हणाली. प्रार्थना हिच्या शिक्षणाबद्दल सांगायचं झालं तर, तिने स्टॅटिस्टिक्स (डींरींळींळली) मधून पदवी घेतली आहे. शिवाय अभिनेत्री भरतनाट्यम विशारदही आहे. तर सध्या प्रार्थना 'अगं अगं सुनबाई काय म्हणता सासूबाई' सिनेमामुळे चर्चेत आहे.



## गाजावाजा न करता अभिनेत्याने राजपाल यादवला केली मदत

**मुंबई :** बॉलिवूड अभिनेता नवाजुद्दीन सिद्दीकी पुन्हा एकदा आपल्या जुन्या मित्रासाठी म्हणजेच अभिनेता राजपाल यादवच्यासोबत ठामपणे उभा राहिल्याचे पाहायला मिळत आहे. सध्या वैयक्तिक आणि कायदेशीर अडचणींचा सामना करत असलेल्या राजपाल यादवला नवाजुद्दीन सिद्दीकीने कोणतीही प्रसिद्धी न करता गुपचूप आर्थिक मदत केल्याची माहिती सूत्रांकडून समोर आली आहे. विशेष बाब म्हणजे, या मदतीबाबत नवाजुद्दीने ना कोणते विधान केले, ना सोशल मीडियावर याचा गाजावाजा केला. नवाजुद्दीन सिद्दीकी हा साध्या जीवनशैलीसाठी आणि खासगी आयुष्य लाइमलाइटपासून दूर ठेवण्याच्या स्वभावासाठी ओळखला जातो. त्याच्याशी जवळीक असलेल्या लोकांच्या मते, ही मदत केवळ मित्रत्त्व निभावण्यासाठी करण्यात आली असून त्यामागे कोणताही प्रचाराचा उद्देश नाही. 'चांगली कामं शांतपणे करावीत' या तत्वावर नवाजुद्दीन आजही ठाम आहे.सूत्रांच्या माहितीनुसार, नवाजुद्दीन सिद्दीकीने




यापूर्वीही राजपाल यादवला आर्थिक मदत केली आहे. काही काळापूर्वी त्याने सुमारे १० लाख रुपयांची मदत केल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, त्यावेळीही त्याने याचा कुठेही उल्लेख केला नाही. त्याच्या जवळच्या मंडळींच्या मते नवाजुद्दीन सिद्दीकीला अशा गोष्टींसाठी प्रसिद्धी मिळवण्यात रस नाही. मदत करणे हे त्याच्यासाठी मानवी कर्तव्य आहे प्रसिद्धीचं साधन नाही.

अलीकडे राजपाल यादवच्या अडचणींमुळे सोशल मीडियावर अनेक चर्चा सुरू होत्या. काही युजर्सनी तर थेट प्रश्न उपस्थित केला होता की, 'अवघड काळात इंडस्ट्रीतील मित्र कुठे आहेत?' अशा चर्चांच्या दरम्यानच ही माहिती समोर आली की, नवाजुद्दीन सिद्दीकी सतत राजपाल यादवच्या संपर्कात आहे आणि शक्य ती सर्व मदत करत आहे. चित्रपटसृष्टीतील जाणकारांच्या मते, नवाजुद्दीन सिद्दीकी हा नेहमीच आपल्या मित्रांसाठी उभा राहणारा कलाकार आहे. एका जुन्या मुलाखतीत नवाजुद्दीन सिद्दीकीने स्वतः राजपाल यादवच्या मोठ्या मनाचं कौतुक केलं होतं. त्याने सांगितलं होतं की, जेव्हा राजपाल यादवला काम मिळायला सुरुवात झाली होती, त्या काळात तो संघर्ष करणाऱ्या कलाकारांना मनापासून मदत करत असत. नवाजुद्दीनच्या शब्दांत, 'राजपाल यादवचं घर म्हणजे जणू लंगरच होतं. कोणीही भुकेला तिथे गेला तर त्याला जेवण मिळायचंच'. हा किस्सा दोघांमधील नातं केवळ व्यावसायिक नसून खऱ्या अर्थाने मैत्रीवर आधारित असल्याचं स्पष्ट करतो.

**

## २४ व्या वर्षी प्रसिद्ध अभिनेत्री बनली डॉक्टर १७०० कोटींचा ब्लॉकबस्टर तिच्या नावे

**मुंबई :** प्रसिद्ध अभिनेत्रीने वयाच्या २४ वर्षी एमबीबीएसची पदवी प्राप्त करत डॉक्टर बनली आहे. गेल्या सहा वर्षांपासून ती या पदवीसाठी कठोर मेहनत करत होती. विशेष म्हणजे चित्रपटांमध्ये काम करण्यासोबतच ती अभ्यासासाठीही वेळ काढत होती. सहा वर्षांच्या या मेहनतीचं फळ अखेर तिला मिळालं आहे. ही अभिनेत्री दुसरी तिसरी कोणी नसून कन्नड आणि तेलुगू चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय श्रीलीला आहे. चित्रपटसृष्टीत यशस्वी करिअर सुरू ठेवून तिने एमबीबीएसची डिग्री घेतली आहे. ती २०२० च्या बॅचची असून ही पदवी मिळवण्यासाठी तिला ६ वर्षे लागली आहेत. सोशल मीडियावर श्रीलीलाच्या दीक्षांत समारोहाचा व्हिडीओ व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये तिच्या चेहऱ्यावरील आनंद सहज पहायला मिळतोय.

वैद्यकीय शिक्षण आणि शूटिंगचं व्यस्त शेड्युल यांच्यात समतोल साधून तिने हे यश संपादन केलं आहे. चित्रपटांच्या शूटिंगचं शेड्युल व्यस्त असतानाही तिने वेळ मिळेल तेव्हा अभ्यास केला. याशिवाय प्रमोशनसाठीच्या कार्यक्रमांनाही तिला सतत हजर राहावं लागत होतं.

या दोन्ही गोष्टी एकाच वेळी सांभाळताना श्रीलीलाची तारेवरची कसरत झाली. अखेर शिस्त, एकाग्रता आणि दृढनिश्चय यांच्या जोरावर तिने एमबीबीएसची पदवी मिळवली.सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या एका व्हिडीओमध्ये ती स्टेजवर दुसऱ्या विद्यार्थ्यांसोबत रांगेत उभी असल्याची पहायला मिळत आहे. पदवी स्वीकारल्यानंतर ती तिच्या कुटुंबीयांना मिठी मारते आणि नंतर मंचावरून खाली उतरते. आणखी एका व्हिडीओमध्ये विद्यार्थी हिप्पोक्रॅटकची शपथ घेताना दिसत आहेत. जेव्हा ते अधिकृतपणे २०२० च्या बॅचचे डॉक्टर झाल्याची घोषणा केली जाते, तेव्हा श्रीलीला हसते आणि तिच्या मैत्रिणींसह आनंद साजरा करते.श्रीलीलाचा जन्म २००१ मध्ये अमेरिकेतील डेट्रॉईट इथं एका तेलुगू कुटुंबात झाला. ती बेंगळुरूमध्ये लहानाची मोठी झाली. श्रीलीलाची आई स्वर्णलता या बेंगळुरूमध्ये स्त्रीरोगतज्ज्ञ आहेत. तिने २०१७ मध्ये 'चित्रांगदा' या चित्रपटातून अभिनयक्षेत्रात पदार्पण केलं होतं. तर मुख्य अभिनेत्री म्हणून तिचा पहिला चित्रपट २०१९ मध्ये प्रदर्शित झाला. कन्नड भाषेतील या चित्रपटाचं नाव 'किस' असं होतं. ती लवकरच अनुराग बासू दिग्दर्शित बॉलिवूड चित्रपटातूनही प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. यामध्ये ती अभिनेता कार्तिक आर्यनसोबत झळकणार आहे.

# बुलढाण्यात शेळीपालन, कुक्कुट व गाय/म्हैस पालन प्रशिक्षण कार्यक्रम

**जनसंचलन/बुलढाणा**
सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना स्वयंपूर्णतेकडे मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र () यांच्या वतीने जिल्हा उद्योग केंद्र, बुलढाणा मार्फत शेळीपालन, कुक्कुट पालन तसेच गाय/म्हैस पालन या विषयांवरील पाच दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम दि. २४ फेब्रुवारी २०२६ ते २८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत बुलढाणा येथे होणार आहे. प्रशिक्षणामध्ये शेळी, कुक्कुट व दुधाळ जनावरांचे तंत्रशुद्ध पालन, विविध जाती व त्यांचे प्रकार, लसीकरण, रोग व लक्षणे, खाद्य निर्मिती, चाऱ्याचे प्रकार यांसह उद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन दिले जाणार आहे. तसेच उद्योजकता विकास, उद्योग संधी, शासकीय योजनांची माहिती आदी विषयांवर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येईल. प्रवेशासाठी उमेदवार किमान ५ वी उत्तीर्ण, वय १८ ते ५० वर्षे असणे आवश्यक आहे. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्यांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. नोंदणी, प्रशिक्षण शुल्क व अधिक माहितीसाठी दि. २३ फ `ब्रुवारी २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत गणेश गुप्ता, प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, जिल्हा उद्योग केंद्र, तहसील कार्यालयाजवळ, चिखली रोड, बुलढाणा यांच्याशी संपर्क साधावा. संपर्क: ९०११५७८८५४ / ८२७५०९३२०१. सदर आवाहन किशोर अंभोरे, विभागीय अधिकारी, अमरावती यांनी केले आहे.

# खामगावचा गुरुवारचा आठवडी बाजार पुढे ढकलला

**जनसंचलन/खामगाव**
खामगाव शहरात दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा होणार असल्याने त्या दिवशी भरविण्यात येणारा गुरुवारचा आठवडी बाजार रद्द करून पुढील दिवशी भरविण्याचे आदेश जिल्हादंडाधिकाऱ्यांनी जारी केले आहेत. पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांनी संदर्भीय पत्राद्वारे कळविले होते की, जयंतीनिमित्त शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून मोठ्या प्रमाणावर नागरिक सहभागी होतात. त्याच दिवशी आठवडी बाजार भरत असल्याने वाहतुकीची कोंडी होण्याची तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर बाजार आणि यात्रा कायदा, १८६२ च्या कलम ५ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून जिल्हादंडाधिकाऱ्यांनी १९ फेब्रुवारीचा आठवडी बाजार रद्द करून तो पुढील दिवशी भरविण्याचे निर्देश दिले आहेत. नागरिकांनी व व्यापाऱ्यांनी सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# भगवान कानडजे यांची काव्य महोत्सवासाठी निमंत्रित



**जनसंचलन/बुलढाणा**
साहित्यिक,सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या बांधिलकी प्रतिष्ठान अमरावती द्वारा राज्यस्तरीय काव्य महोत्सवाचे दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ रोजी कांचन रिसॉर्ट नवसारी येथे आयोजन करण्यात आले आहे. या राज्य काव्य महोत्सवासाठी बुलढाणा येथील भगवान कानडजे यांची निमंत्रित कवी म्हणून वर्णी लागली आहे. या राज्यस्तरीय संमेलनात राज्यभरातील प्रसिद्ध सत्तर निवडक कवींचे काव्यप्रभा या काव्यसंग्रहाचे विमोचन यावेळी करण्यात येणार आहे. यापूर्वी कानडजे यांच्या जागर माय मराठीचा या कवितेची राज्यस्तरीय कवी संमेलनात निवड झाली होती आणि चंद्र प्रिया कवितेचा सन्मान मावळ येथील राज्यस्तरीय संमेलनात करण्यात आला होता. अमरावती येथे होणाऱ्या संमेलनाला पनवेल येथील सर्जनशील साहित्य संघाचे संस्थापक प्रवीण बोपुलकर हे संमेलनाध्यक्ष तर उद्घाटक म्हणून नागपूर येथील अक्षर क्रांती प्रतिष्ठानचे अध्यक्ष शंकर घोरसे हे असणार आहे तसेच स्वागताध्यक्ष म्हणून उद्योजिका कांचनताई उल्हे, प्रमुख अतिथी शोभाताई रोकडे साहित्यिक, प्रभाकर तांडेकर प्रसिद्ध ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक नागपूर, संयोजिका एडवोकेट निताताई कचवे संस्थापक बांधिलकी प्रतिष्ठान अमरावती यांच्या उपस्थितीत पार पडणार आहे.. या संमेलनात इमान न राहिले माणसा माणसात आताही कविता कानडजे सादर करणार आहेत या संमेलनाला राज्यभरातून साहित्यिक उपस्थित राहणार आहे तरी काव्यप्रेमीनि उपस्थित राहण्याचे आवाहन बांधिलकी प्रतिष्ठान परिवारातील सदस्यांनी केले आहे.

# डोणगाव येथे जिओचा खेळखंडोबा; नेटवर्कअभावी विद्यार्थी आणि नागरिक मेटाकुटीला वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

## संतप्त ग्राहकांचा सिम पोर्ट करण्याचा इशारा




**जनसंचलन/डोणगाव**
येथील जिओ कंपनीचे नेटवर्क टॉवर सतत बंद राहत असल्यामुळे स्थानिक नागरिक आणि विद्यार्थ्यांचे प्रचंड हाल होत आहेत. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या या विस्कळीत सेवेमुळे जिओ सिमधारकांचे दैनंदिन व्यवहार पूर्णपणे ठप्प झाले असून, कंपनीच्या ढिसाळ कारभाराबद्दल तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

**विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान**
सध्या माध्यमिक व उच्च माध्यमिक बोर्डाच्या परीक्षा सुरू आहेत. अशा महत्त्वाच्या काळात इंटरनेट सेवा गायब असल्याने विद्यार्थ्यांना ऑनलाइन शैक्षणिक साहित्य मिळवणे किंवा ऑनलाइन शिकवणी वर्गांना उपस्थित राहणे अशक्य झाले आहे. परीक्षेच्या काळात उद्भवलेल्या या तांत्रिक समस्येमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे.

**बँकिंग आणि ऑनलाईन व्यवहार कोलमडले**
आजच्या काळात सर्वच व्यवहार ऑनलाइन झाले असताना, इंटरनेटअभावी बँकिंग सेवा, यूपीआय पेमेंट आणि इतर महत्त्वाची शासकीय कामे रखडली आहेत. यामुळे नागरिकांना आर्थिक आणि मानसिक त्रासाचा सामना करावा लागत आहे. पैसे भरले असूनही सेवा मिळत नसेल, तर कंपनीने जाब द्यावा, अशी भावना ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

**सिम पोर्ट करण्याचा इशारा**
जिओ कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन डोणगाव येथील नेटवर्क सेवा सुरळीत करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. जर ही समस्या लवकर सुटली नाही, तर सर्व ग्राहक सामूहिकरीत्या आपले सिम कार्ड दुसऱ्या कंपनीत पोर्ट करतील, असा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

# बुलडाणा अर्बन संस्थेच्या फार्मर प्रोड्युसर कंपनीतर्फे शेतकरी सभासद अल्पदरात भाडेतत्त्वावर हार्वेस्टर उपलब्ध....

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलडाणा अर्बन संस्था शेतकरी सभासदांना कायम मदतीसाठी पुढे असते, संस्था शेतकरी सभासदांच्या हितासाठी विविध योजना राबविल्या जातात. त्याचाच एक भाग म्हणून बुलडाणा अर्बन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी, बुलडाणा अर्बन संस्थेचे नुतन अध्यक्ष डॉ.सुकेश झंवर, बुलडाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटीच्या अध्यक्षा सौ कोमलताई झंवर ,संस्थेचे सर व्यवस्थापक कैलास कासट, बुलडाणा ग्रामीण दोनचे विभागीय व्यवस्थापक सुधीर भालेराव यांच्या मार्गदर्शना खाली संस्थेच्या फार्मर प्रोड्युसर कंपनी



अंतर्गत शेतकरी सभासद यांच्या करता अत्यंत अल्पदरात भाडेतत्त्वावर देण्यासाठी हार्वेस्टर उपलब्ध करून दिले आहे. दिनांक ११/०२२०२६ रोजी हार्वेस्टरचे उद्घाटन सौ. कोमलताई झंवर यांच्या हस्ते करण्यात आले. हार्वेस्टर मध्ये सोयाबीन,हरभरा, गहू तुर,उडीद, करडई इत्यादी पिके हार्वेस्टर होतात हे सर्व शेतकरी बांधवांना उपलब्ध असून या हार्वेस्टर चे भाडे अल्पदरामध्ये राहणार आहे तरी या संधीचा लाभ सर्व शेतकऱ्यांनी घ्यावा असे आवाहन सौ कोमलताई झंवर यांनी केले. कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी विभागीय व्यवस्थापक सुधीर भालेराव शाखा व्यवस्थापक अजय कराळे , पराग कुळकर्णी, कौशल्य चांडक व इतर सर्व कर्मचारी उपस्थित होते.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणूक कालावधी महिने | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

### ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


# जिल्हा परिषद विभागीय सांस्कृतिक महोत्सवाचा जल्लोषात समारोप बुलढाणेकर रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा परिषद अधिकारी कर्मचारी यांच्या दोन दिवसीय विभागीय सांस्कृतिक महोत्सवात पाच ही जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांनी केलेले विविध प्रकारातील कलागुणांचे सादरीकरण हे निश्चितच व्यावसायिक तोडीचे होते. यापुढे सुद्धा या कलाकारांनी आपल्या कला संस्कृतीच्या संवर्धनासाठी सदैव प्रयत्नशील राहावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी केले. स्थानीय जिल्हा क्रीडा संकुल येथे सुरू असलेल्या जिल्हा परिषद अधिकारी कर्मचारी यांच्या विभागीय सांस्कृतिक महोत्सवाचा समारोप शुक्रवारी रात्री पार पडला. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी मंचावर मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या सुविद्य पत्नी रिपिका खरात, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक पांडुरंग कोल्हे, क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सव आयोजन समितीचे सदस्य सचिव तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष पवार , मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रकाश राठोड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद एंडोले, सहभागी जिल्हा परिषदेचे जिल्हा समन्वयक, अन्य खातेप्रमुख व पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आपल्या कुटुंबासह प्रामुख्याने उपस्थित होते. दिनांक १२ व १३ या दोन दिवशी सायंकाळी ६ ते रात्री १० पर्यंत संपन्न झालेल्या या सांस्कृतिक महोत्सवात भावगीत, भक्तीगीत, लोकगीत, सिनेगीत, युगलगीत. कॅरी ओकी गीत एकल नृत्य, समूह नृत्य, हास्य जत्रा इत्यादी विविध कला प्रकारातील कलांचे सादरीकरण जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून करण्यात आले. अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशिम व यवतमाळ या जिल्हा परिषद चे प्रतिनिधित्व करणाऱ्या कलाकारांच्या चमू या महोत्सवात सहभागी झाल्या होत्या. या दोन दिवसीय सांस्कृतिक महोत्सवास जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांबरोबरच स्थानिक बुलढाणेकरांनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला. बुलढाणा शहरातील नागरिकांची भरगच्च उपस्थिती हे या महोत्सवाची तसेच बुलढाण्याच्या सांस्कृतिक रसिकतेची पावती देणारी ठरली.


दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८